महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना – २४९९/– रु.

तीन महिने – ५९९९/– रु.

सहा महिने – ९९९९/– रु.

* संपादक *

मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – ३७ ■ मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

# सणासुदीच्या काळात ‘सण महाराष्ट्राचा – संकल्प अन्न सुरक्षेचा’ विशेष मोहीम – मंत्री नरहरी झिरवाळ

## नाशिक येथे मोहिमेचा आरंभ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. ११ : सणासुदीच्या काळात होणारी संभाव्य भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून सण महाराष्ट्राचा संकल्प अन्न सुरक्षेचा या राज्यव्यापी मोहिमेचा आरंभ अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते नाशिक येथे करण्यात आला.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, ही मोहीम दिवाळी संपेपर्यंत संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असून मिठाई, खाद्यतेल, खवा, मावा दूध आदी अन्न पदार्थांच्या गुणवत्तेवर यामध्ये विशेष लक्ष देण्यात येणार आहे.




राज्यात आगामी काळात साजरे होणारे सण पोळा, गणेशोत्सव, ईद, गौरी पूजन, नवरात्र महोत्सव, दसरा व दिवाळीच्या अनुषंगाने या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. तपासणीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्यास त्या आस्थापनांचे परवाने रद्द करण्याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. अखाद्य, अपायकारक नमुने नियमानुसार नष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व अन्न सुरक्षा आणि मानके नियम, २०११ नुसार शास्तीबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तपासणी मोहिमेत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त यांचाही सहभाग असणार आहे. सणासुदीच्या काळात महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील टोलनाक्यांवर परराज्यातून येणाऱ्या खव्यासारख्या पदार्थांच्या अचानक तपासणी मोहिम सोबतच सुरक्षित अन्न पदार्थाबाबत प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार आहे. ही मोहीम दिवाळीसंपेपर्यंत दर महिन्याला



नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

# एस.एन.डी. अभियांत्रिकी महाविद्यालयाला युजीसीकडून स्वायत्त दर्जा – रुपेश दराडे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी: नवी दिल्लीच्या विश्वविद्यालय अनुदान आयोगाने (यु.जी.सी.) येवला येथील एस एन डी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्राला २०२५–२६ शैक्षणिक वर्षांपासून स्वायत्त (ऑटोनॉमस) महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. तर स्वायत्तता शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून कार्यान्वित करणार आहे शैक्षणिक व भौतिक गुणवत्ता जपल्याने स्वायत्तता मिळालेले हे नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातून पहिले महाविद्यालय ठरले असल्याचे संस्थेचे संचालक कुणाल दराडे, कार्यकारी संचालक रुपेश दराडे यांनी सांगितले. एस एन डी अभियांत्रिकी महाविद्यालय २००६ पासून बाभुळगाव येवला येथे सुरु झाले असून विविध अभियांत्रिकी शाखाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शिस्त यासाठी ओळखले जाते. विशेष म्हणजे मागील १९ वर्षात परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना उत्तम अभियंते घडवून महाविद्यालयाने नावलौकिक मिळविला आहे.किंबहुना परिसराच्या विकासासाठी देखील नक्कीच सकारात्मक योगदान दिले आहे. सध्या माविद्यालयात अभियांत्रिकीच्या सात विविध शाखासह बीबीए बीसीए एमसीए एमबीए अ भ्यासक्रमात १६०० विध्यार्थी शिकत आहेत तर नवीन प्रवेशित ९०० विध्यार्थी आहेत असे एकूण २५०० एकूण संख्या होईल . ग्रामीण भागात असूनही अत्यंत कमी कालावधीत स्वायत्तता दर्जा मिळविणारे महाविद्यालय म्हणून एस एन डी अभियांत्रिकी च्या शिरपेचात अजून एक सन्मान वाढला आहे. स्वायत्त महाविद्यालय म्हणून आता एस एन डी अभियांत्रीकी महाविद्यालय अभ्यासक्रमामध्ये कालानुरूप तसेच औदयोगिक क्षेत्रास लागणारा बदल करू शकणार असल्याची माहिती प्राचार्य डी.एम यादव दिली. विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी गरजेवर आधारित अल्पकालीन अभ्यासक्रम देखील देऊ शकते. नवीन तंत्रज्ञानांचा वापर करून अध्यापनाच्या पद्धतीचा वापर करू शकणार आहे तसेच परीक्षा आणि मूल्यमापन करण्यासाठी महाविद्यालय स्वतंत्र असले तरी पदवी मात्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचीच मिळणार आहे. एस एन डी अभियंत्रिकीच्या या दैदीप्यमान यशाबद्दल मार्गदर्शक मा . आमदार नरेंद्र दराडे, संस्थाध्याक्ष आमदार किशोर दराडे,सचिव कुणाल दराडे संचालक रुपेश दराडे यांनी सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. महाविद्यालयातील अनुभवी शिक्षकवृंद, गुणवत्तापूर्ण शिक्षण ,रोजगाराच्या उपलब्ध संधी याद्वारे महाविद्यालय नेहमीच अग्रेसर राहिले आहे.यावेळी .सिव्हिल विभागप्रमुख डॉ उबेद अन्सारी,मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ हरजीत पवार ,कॉम्प्युटर विभागप्रमुख डॉ गिरीशा बोंबले इलेक्ट्रिकल विभागप्रमुख डॉ पवन टापरे शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. संदीप येवले रजिस्ट्रार प्रा. दत्तात्रय क्षीरसागर , एमबीए विभागप्रमुख प्रा. पी. एम दंडगव्हाळ, एमसीए विभागप्रमुख साठे प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ विद्या निकम , इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ प्रकाश रोकडे , मेकॅट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ हर्षल राणे इलेकट्रॉनिक्स, ऍण्ड कॉम्पुटर विभागप्रमुख प्रा. गणेश ढाके डॉ अजित भाने प्राध्यापक व उपस्थित होते

**स्वायत्तता मिळाल्यानंतर व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख असा विद्यार्थी विकासाचा अभ्यासक्रम आम्ही राबवून विद्यार्थ्यांना त्यात्या क्षेत्रातील कौशल्ये विकसित करण्याचा आमचा सकारात्मक प्रयत्न असेल. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू करताना आम्हाला याचा उपयोग होणार आहे. गुणवत्ता वाढीसाठी विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठ बरोबर सामंजस्य करार करणार आहे.**

**–डॉ. डी. एम. यादव, प्राचार्य,एस एन डी अभियांत्रिकी महाविद्यालय**

**२००६ मध्ये अभियांत्रिकीच्या तीन पाच शाखेवर सुरु झालेल हे छोटेसे रोपटे आता अभियंत्रिकी, व्यवस्थापन, औषधनिर्माण शास्त्र ,नर्सिंग तंत्रनिकेतन, सीबीएसई स्कुल ज्युनिअर कॉलेज आणि वैद्यकीय महाविद्यालय या रूपात मोठया वटवृक्षात बदल झालेले आहे. हजारो विध्यार्थी विविध आंतरराष्ट्रीय कंपन्या मध्ये उच्च पदावर काम करत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आम्ही यशस्वी झालो असून हजारो विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. लवकरच स्वायत्त विद्यापीठ करण्याचा मानस आहे.**

**– रुपेश दराडे, संचालक जगदंबा शिक्षण संस्था .**

# नाशिक येथे जिल्हास्तरीय वुशू क्रीडा स्पर्धा संपन्न

## स्पर्धेत जिल्ह्यातील खेळाडूंचा सहभाग



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (प्रतिनिधी)

मीनाताई ठाकरे स्टेडियम नाशिक येथे जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातील शेकडो खेळाडूंनी सहभाग घेतला.

दि.१० ऑगस्ट रोजी या स्पर्धेचे आयोजन जिल्हा संघटनेचे सचिव पृथ्वीराज वडघुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले ते उद्धाटन प्रसंगी म्हणाले की कोणताही खेळ हा माणसाला लढायला शिकवतो. खेळणे आरोग्यस उत्तम राहते.या स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना सरकारी नोकरीत प्राधान्य दिले जाते. वुशू हा क्रीडा प्रकार युद्ध कलेतील खेळ प्रकार आहे.

या स्पर्धेत जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील खेळाडू सहभागी झाले होते. झालेल्या स्पर्धेत नांदगाव तालुक्याने प्रथम पारितोषिक मिळविले तसेच द्वितीय पारितोषिक निफाड तालुक्याने मिळविले व तृतीय पारितोषिक दिंडोरी तालुका आणि चतुर्थ पारितोषिक सिन्नर तालक्याने मिळविले.

या स्पर्धेत सर्व खेळाडूंनी चांगल्या प्रकारे प्रदर्शन करत आपल्या शाळेचे व तालुक्यांची नाव उंचविले आहेत या स्पर्धेत सुवर्णपदक घेणारा खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संधी भेटणार असल्याने स्पर्धकांच्या चेहऱ्यावरती आनंद दिसून आले.

या स्पर्धेचे आयोजक जिल्हा सचिव पृथ्वीराज वडघुले, संकेत चंद्र मोरे होते तसेच राष्ट्रीय खेळाडू व पंच मेघा शंकर पवार, राजेंद्र बेलोटे यांनी पंच म्हणून कामगिरी बघितली,व राम पवार,तेजस्विनी घुगे,विष्णू शेटे, कावेरी डोंगरे,मुकेश सोनवने, अनिता गोनोटे,राहुल तांबे,सार्थक जाधव, शुभम पवार, प्रियंका खैरनार,साहिल पगार,जन्मजय कांबळे,मयंक लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

# पाटोदा सर्कल अंतर्गत महसूल सप्ताह अंतर्गत विविध दाखल्यांचे वाटप



**दै. आवाज वृत्तसेवा...**

राजापूर लक्ष्मण घुगे :- पाटोदा येथील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताह व छत्रपती शिवाजी महाराज राजस्व मोहीम अभियानांतर्गत पाटोदा येथे विविध दाखल्यांचे तसेच नवीन रेशनकार्डे वाटप करण्यात आले. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार नितीन बहिकर मंडळ अधिकारी राहुल देशमुख यांनी शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहेबराव आहेर हे होते. यावेळी उत्पन्न, वय अधिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नवीन रेशनकार्ड, नॉनक्रिमिलियर प्रमाणपत्र, राष्टीयत्वाचे प्रमाणपत्र दाखल्यांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब पिंपरकर, माजी सरपंच सूर्यभान नाईकवाडे मारुती घोरपडे, रामभाऊ नाईकवाडे, संतोष दौंडे संपत बोरनारे बबन शेटे,ग्राम महसूल अधिकारी संतोष आठवलेकृषी अधिकारी शिवाजी मुळे, कोतवाल लक्ष्मण आहेर आपले सेवा सरकार केंद्राचे गोरख घुसळे, संतोष कुंभारकर, निखिल आभाडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लासलगाव–निफाडच्या खेळाडूंचा वुशू स्पर्धेत सुवर्ण वर्षाव; ३० पैकी २६ सुवर्ण पदके पटकावत शानदार कामगिरी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव – रविवारी दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या नाशिक जिल्हा वुशू असोसिएशन आयोजित स्पर्धेत योध्दा मिक्स मार्शल आर्ट्स अकॅडमी, लासलगाव येथील खेळाडूंनी शानदार कामगिरी करत एकूण ३० पैकी २६ सुवर्ण, २ रौप्य आणि २ कांस्य पदकं पटकावली. या स्पर्धेत लासलगाव व निफाड तालुक्याचं प्रतिनिधित्व करत योध्दा अकॅडमीच्या खेळाडूंनी आपली सरस तयारी आणि दमदार खेळ सादर केला. विशेष म्हणजे, या विजेत्या खेळाडूंची आता राज्यस्तरीय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल अकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक श्री. राम राजेंद्र पवार यांनी सांगितले की, ही कामगिरी खेळाडूंच्या मेहनतीचे व शिस्तीचे फळ आहे, पुढे आणखी मोठ्या पातळीवर चमक दाखवण्याचा आमचा प्रयत्न राहील.

# अनकई किल्ल्यावर भाविकांची गर्दी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी – तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अगस्ती ऋषींच्या येवला तालुक्यातील अनकई किल्ल्यावर भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती.या सोमवार दि.११ ऑगस्ट रोजी अनकई ट्रेकर्स ग्रुप मनमाड,बाबा अमरनाथ ग्रुप मनमाड,जय बाबाजी परिवार कुसुर यांच्या संयुक्त विद्यमाने अनकई किल्ल्यावर भाविक भक्तांसाठी श्रावण मासानिमित्त तिसऱ्या सोमवारी साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.



याप्रसंगी अगस्ती आश्रमाचे महंत ज्ञानेश्वर माऊली उपस्थित होते.तर ट्रेकर्स ग्रुप तर्फे अगस्ती आश्रमासाठी सीसी टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले.भजन कीर्तनासाठी आश्रमाला साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली.याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजन सुनील पवार बाबा बोरसे यांच्या ट्रेकर्स ग्रुपने केले. यावेळी गावातील भाविकांनी ग्रुपचे आभार मानले.

# शतक गाठण्याची उमेद ..!!






**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील पोखरी गावातील एक साधेसे घर आमच्या शाळेच्या शेजारी. तिथे राहत होते आमचे बालपणीचे मित्र – शिंदे अण्णा. त्या काळात गावात टीव्ही एखाद-अर्ध्या घरात, मोबाइल तर स्वप्नातही नव्हता, पण अण्णांकडे होता एक खजिना अर्थात 'रेडिओ'.. त्यावर आम्ही एकत्र बसून क्रिकेटची कॉमेंट्री ऐकायचो. त्या काळी क्रिकेटच्या प्रत्येक चेंडूची माहिती, प्रत्येक खेळाडूची आ-ळख अण्णांच्या तोंडूनच कळायची. बालपणाच्या त्या आठवणींना आज जवळजवळ दोन तपानंतर पुन्हा उजाळा मिळाला. मी खरेदी-विक्रीच्या कार्यालयात गेलो आणि अचानक अण्णांची भेट झाली. त्यांना पाहताच मनातला मुलगा जागा झाला क्षणाचाही विलंब न करता मी त्यांच्या चरणांना स्पर्श केला आणि अण्णांना विचारले? काय अण्णा ओळखले का?अण्णांनी हसत माझ्या छातीवर एक हलका बुक्का मारत सांगितलं, मग पत्रकारसाहेब, ओळखलं ना!! घरामध्ये कॅलेंडर वर फोटो आहे तुमचा..(दैनिक आवाजच्या कॅलेंडर वर माझा फोटो आहे)..आत्ताशी ८३ वर्षांचा झालो अजून शतक पार करायचंय! अण्णांचे ते वाक्य मनात घर करणारे ठरले..

अण्णांच्या डोळ्यात आजही तीच चमक, चेहऱ्यावर तीच ताजगी आणि ओठांवर उमेदीचे गोड हास्य..





मो. ९५४५९१०१७७

अण्णांची उमेद – तरुणाईला शिकवण

आजकाल आपण पाहतो, ३०-३५ व्या वर्षीच काही जण थकलेले असतात, ५० च्या आतच आयुष्याचा उत्साह हरवतात.

पण अण्णांचे ८३ वर्षे म्हणजे अनुभव, संघर्ष आणि तरीही 'आयुष्य अजून जगायचंय' ही आग्रही भूमिका संत तुकाराम महाराजांचे अभंग आठवून देतात ज्यात म्हटले आहे आयुष्याचा हरख, देवाची रेख,जगा आनंदे, नका करा लेख

अण्णांनी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उत्साहाचा हात धरला आहे. वय वाढलं, अंग थकलं, पण मनाची ज्योत विझू दिली नाही.

जगण्याची कला

अण्णांच्या आयुष्यातील तीन गोष्टी तरुण पिढीने आत्मसात करायला हव्यात:

१. उत्साह जपा – खेळ असो, काम असो, किंवा साधं फिरणं असो; आनंदाने करा.

२. जिज्ञासा ठेवा – अण्णांनी रेडिओवरून जगाचा आवाज ऐकला; आज तुमच्याकडे इंटरनेट आहे, मग शिकणं का थांबवायचं?

३. शरीर आणि मनाची काळजी घ्या – वय हे केवळ आकड्याचं गणित आहे; खरी ऊर्जा मनातून येते.

अण्णा म्हणजे या वचनाचा जिवंत आदर्श

तरुणांसाठी संदेश

आज अनेक तरुण, नोकरीच्या ताणावात, स्पर्धेच्या शर्यतीत, किंवा छोट्या अडचणींनी खचून जातात. काही जण तर जीवनाची उमेद पूर्णपणे गमावून बसतात. पण अण्णा सांगतात: अजून बघायचंय, अजून करायचंय, अजून शिकायचंय आयुष्य संपत नाही जोवर मन जगतंय!

संत कबीर यांची वाणी येथे अण्णांच्या तत्त्वज्ञानाला सार्थ ठरवते,

चलती चाकी देख के, दिया कबीरा रोय,
दोन पाटन के बीच में, साबुत बचा ना कोय

म्हणजेच, वेळेच्या गिरणीत सगळे जातात, पण ज्यांनी उमेद, श्रद्धा आणि हसणं जपलं, त्यांचं मन सदैव तरुण राहतं.

शिंदे अण्णांचं हे ८३ वं वर्ष म्हणजे उमेदेचा उत्सव आहे. त्यांनी शतक गाठायचं स्वप्न ठेवलंय, आणि आपणही तसंच जगायला शिकलं पाहिजे – वयाच्या आकड्याने नव्हे तर मनाच्या उमेदीने.

अण्णा शतायुषी व्हा!!!

***

# नांदगाव येथील जेष्ठ नागरिक संघाकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (प्रतिनिधी) विद्या ही अशी गोष्ट आहे की ती कोणालाही चोरता येत नाही ती प्रत्येक व्यक्ती आत्मसात करत असतो व जीवनात यशस्वी होतो पण सध्या तो आजोबा-आजींना विसरत चालला आहे. ही खंत आहे. तुम्ही या ज्येष्ठांच्या हातुन सन्मानित होत आहात ही अभिमानाची गोष्ट असुन त्यांच्या परत फेडी साठी आपल्या आजुबाजूला असणाऱ्या ज्येष्ठांचा मान राखा , त्यांचा सन्मान करा त्यांच्याशी आदराने वागा हीच त्यांची माफक अपेक्षा आहे. नांदगाव येथील जेष्ठ नागरिक संघाने नातवाच्या भावनेतुन केलेला तुमचा सन्मान हा सर्वात मोठा सन्मान आहे.असे प्रतिपादन प्रतिष्ठित व्यापारी व युवा नेते दत्तराज छाजेड यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमाला महावीर सुराणा, कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती एकनाथ सदगीर, पुंजाराम जाधव, सुरजमल संत,श्रावण आढाव, शिवाजी गरुड, शिवाजी निकम, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थित जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने येथील विरंगुळा केंद्र लक्ष्मीनगर येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला. तो सोहळ्यात नांदगाव शहरातील विविध शाळेतील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यात वाबळे पुनम, ओम खैरनार,अनम नांद गालीब शेख,शेख उम्मी आमराई असिफ, रसिका सोनुसिंघ मेडतिया,श्रावणी गायकवाड,रोशनी थोरे, श्रावणी राठोड, दर्शन सोनवणे,शिव सोनवणे,अमेय फणसे,मनिषा शिंदे , जयश्री गिते,दर्शनी कुमावत,श्रृती सोनवणे,पार्थ कलंत्री,अर्थव जोशी मेधा शिंदे या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पुज्य साने गुरुजी यांच्या जगाला प्रेम अर्पावे, या प्रार्थनेने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन करण्यात आले. संघाचे जेष्ठ सदस्य रंगनाथ चव्हाण गुरुजी यांनी प्रास्ताविकात जेष्ठ नागरिक संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना स्मृती चिन्हे देऊन आम्हाला प्रोत्साहित केले व आमचे कौतुक केले ही प्रेरणा पुढील शिक्षणासाठी नक्कीच बळ देणारी आहे अशी भावना मनोगतातून रोशनी थोरे या विद्यार्थ्यांनीने व्यक्त केली. यावेळी जेष्ठ नागरिक श्रावण आढाव यांनी विद्यार्थ्यांना मनोगतातून शुभेच्छा दिल्या व उपस्थित पाहुण्यांनी देखिल भावना व्यक्त केल्या. या प्रसंगी माणिकराव कवडे, विलास बच्छाव, रमाकांत सोनवणे, जयवंत साळवे, थोरात काका, शेषराव पाटील, अशोक पाटील, विश्वास ढोकळे, शहा काका , पत्रकार महेश पेवाल, सुरेश शेळके, विजय बडोदे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश नारायणे यांनी केले. तर आभार शिवाजी निकम यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# पत्रकार कमाल शेख हल्ला प्रकरणी व्हॉईस ऑफ मिडियाचे मुख्यमंत्र्यांसह जिल्हा अधिकारी, पोलीस आयुक्तांना निवेदन

**दै. आवाज वृत्तसेवा...**
सुरेश जगताप/ठाणे : राज्यात गेल्या आठवडाभरात चार वेगवेगळ्या ठिकाणी पत्रकारांवर जिवघेणे भ्याड हल्ले करण्यात आले असून,त्याच प्रकारे ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात रविवार दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी वार्तांकनासाठी गेलेल्या पत्रकार कमाल शेख यांच्या वर प्राणघातक हल्ला करण्यात आला. कमाल शेख हे दैनिक महासागर या वृत्तपत्राचे वार्ताहर म्हणून काम करत असुन,ते व्हॉईस ऑफ मिडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या ठाणे जिल्हा कमिटी चे कोषाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांना गंभीर दुखापत झाली असून,हल्लेखोरावर कायदेशीर कठोर कारवाई व्हावी यासाठी व्हॉईस ऑफ मिडिया ठाणे जिल्ह्याच्या वतीने माननीय.मुख्यमंत्री महोदय, मा.जिल्हाधिकारी ठाणे ,मा. पोलीस आयुक्त ठाणे, पोलीस उपायुक्त , बदलापूरचे स्थानिक पोलीस स्टेशन येथे निवेदन देऊन हल्लेखोरावर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे.अशी मागणी करण्यात आली असून, पत्रकार कमाल शेख यांच्या सह त्यांच्या कुटुंबीयांच्या जिविताला धोका असल्या कारणाने त्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे. त्यांच्यावर झालेल्या शारीरिक हल्ल्यामुळे त्यांना वैद्यकीय खर्चासाठी नुकसानभरपाई मिळावी.हल्लेखोरांने त्यांच्या मोबाईलची तोडफोड केल्यामुळे नविन मोबाईल ची व्यवस्था करुन द्यावी.घडलेल्या घटनेची चौकशी एक विशेष अधिकारी नेमुन करण्यात यावी.प्रत्येक पोलीस ठाण्यात एक पत्रकार संपर्क अधिकारी नियुक्त करून त्यांच्या मार्फत पत्रकारांवर होणा-या हल्ल्यांची तात्काळ नोंदणी केली जाईल.पत्रकारांवर होणारे हल्ले,त्यांना दिल्या जाणाऱ्या धमक्यां सारख्या घटनांवर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार एफ आय आर नोंदविण्यात यावा. प्रत्येक पोलीस ठाण्यात पत्रकार नोंदणी व मदत नोंदणी रजिस्टर सुरू करावा.अशा मागण्यांचे निवेदन देण्यात आले असून, निवेदनात म्हटल्याप्रमाणे राज्य सरकार, आणि पोलीस प्रशासना कडून काय कारवाई होते याकडे सर्वसामान्य जनतेसह पत्रकार बांधवांचे लक्ष लागले आहे. हल्लेखोरावर ठोस कारवाई करण्याचे पोलीस आयुक्तांचे आश्वासन तर याप्रसंगी निवेदन देताना व्हॉईस ऑफ मिडियाचे जिल्हा अध्यक्ष श्री.मंगलजी डोंगरे, यांच्या सह कोकण-मुंबई विभागीय अध्यक्ष अरुण जी ठोंबरे, जिल्हा उपाध्यक्ष आदित्य भानुशाली, डिजिटल विंग जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब कांबळे, ठाणे शहर अध्यक्ष भुजंगराव सोनकांबळे, जेष्ठ सल्लागार सुरेश जगताप, भिवंडी शहर अध्यक्ष मोहन राठोड, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सरचिटणीस गणेश भोईर, ठाणे तालुका सरचिटणीस विजय भोसले,यांसह ठाणे शहर कमिटी चे सुनील विश्वकर्मा व अन्य पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोदा सर्कल अंतर्गत महसूल सप्ताह अंतर्गत विविध दाखल्यांचे वाटप



**दै. आवाज वृत्तसेवा...**
लक्ष्मण घुगे राजापूर:- पाटोदा येथील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताह व छत्रपती शिवाजी महाराज राजस्व मोहीम अभियानांतर्गत पाटोदा येथे विविध दाखल्यांचे तसेच नवीन रेशनकार्डे वाटप करण्यात आले. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार नितीन बहिकर मंडळ अधिकारी राहुल देशमुख यांनी शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहेबराव आहेर हे होते. यावेळी उत्पन्न, वय अधिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नवीन रेशनकार्ड, नॉनक्रिमिलियर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब पिंपरकर, माजी सरपंच सूर्यभान नाईकवाडे मारुती घोरपडे, रामभाऊ नाईकवाडे, संतोष दौंडे संपत बोरनारे बबन शेटे, ग्राम महसूल अधिकारी संतोष आठवलेकृषी अधिकारी शिवाजी मुळे, कोतवाल लक्ष्मण आहेर आपले सेवा सरकार केंद्राचे गोरख घुसळे, संतोष कुंभारकर, निखिल आभाडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हनुमाननगर येथे विहिरीवरील साहित्याची चोरी

विंचूर, विंचूरजवळील हनुमाननगर येथे शुक्रवारी (ता. ०८) मध्यरात्री झालेल्या चोरीच्या घटनेने शेतकऱ्यांची चिंता आणखी भर पडली आहे. अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या विहिरीवरील शेतातील विहिरीवरील स्टार्टर, केबल, मेन स्विच, तसेच वायर साहित्य चोरून नेले आहे.

बर्याच दिवसांपासून पाऊस उघडल्याने शेतकऱ्यांचे पिकांना पाणी देण्याची फार गरजेचे असताना हनुमाननगर येथील दीपक साहेबराव गुंड, गोविंद गोपाळा ठुबे, रविंद्र बाबाजी गुंजाळ, वसंत बाबुराव गुंजाळ आदींसह अनेक शेतकऱ्यांचे विहिरीवरील साहित्याची चोरी झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

**हनुमाननगर परिसरात बिबट्याच्या हालचालीमुळे रात्रीच्या वेळी शेतावर कोणी नसल्याने चोरट्यांना मुक्तसंचार मिळतो. एकीकडे बिबट्याची भीती आणि दुसरीकडे चोरट्यांचा त्रास – अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे, प्रशासनाने या दोघांचीही बंदोबस्त करावा. – ज्ञानेश्वर भडांगे, शेतकरी, हनुमाननगर**


## बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क आयोजित वर्षावास मालिका



**दै. आवाज वृत्तसेवा...**
सुरेश जगताप/अंबरनाथ : वर्षभर धम्माचा प्रचार अन् प्रसार करून भरपावसाळ्यात डोंगर दऱ्यातील शांत आणि निर्जन अशा मिळेल त्या ठिकाणी ध्यान साधना करण्यासाठी भिक्खु संघ निवास करायचे त्याला वर्षावास असे म्हणायचे. त्याकाळी परिसरातील उपासक उपासिका भिक्खु संघास अन्नदान व चिवरदान प्रदान करायचे त्याचाच एक भाग म्हणून बौद्धधम्म वाढ विस्तार म्हणुन बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क या भिक्खु संघा मार्फत वर्षभर कार्यक्रम राबवुन या पावसाळ्यातील तीन महिने दरदर आणि घरघर जाऊन वर्षावास प्रवचन मालिका सुरू केली आहे. या अनुषंगाने काल १० ऑगस्ट रविवार रोजी अंबरनाथ येथील पुष्पा कांबळे यांच्या निवास स्थानी वर्षावास प्रवचन मालिका ७ वे पुष्पचे आयोजन केले होते.

माझ्या नावाचा जयजयकार करण्यापेक्षा माझे अपूर्ण कार्य पूर्ण करा यातच सर्वांचे हीत आहे, प्रसंगी प्राणाची बाजी लावा - डॉ बाबासाहेब आंबेडकर (दि. १७ ऑगस्ट १९५२) या विषयावर बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क महाराष्ट्र राज्याचे प्रचारक भीमराव बोराडे यांनी धम्मदेसना दिली. तर बुद्ध धम्म काल आज आणि उद्याचा यावर प्रेमनाथ लोखंडे यांनी माहिती सांगत सूत्रसंचालन केले यावेळी प्रकाश अंगरख, अनामिका इंगोले यांनी प्रवचनातून धम्माची गाथा मांडली. सुरवातीला त्रिशरण पंचशील देऊन धम्मविधी धम्मचारी शीलघोष ढगे गुरुजी यांनी सुरवात केली. या कार्यक्रमात इंद्रपाल कांबळे, बबिता कांबळे, सुनिता राजगुरू, भाग्यश्री बोराडे, शकुंतला जगताप, उषा अंगरख सत्यजीत कांबळे, सत्यम कांबळे, ऐश्वर्या कांबळे, भाग्यश्री कांबळे आदी उपासक उपासिका यांनी उपस्थिती दर्शवुन पुष्पा कांबळे यांच्या कडून अन्नदान ग्रहण केले. शेवटी पुष्पा कांबळे यांनी आर्थिक धम्मदान म्हणुन रु. १५००/- देऊन सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सागता केली.

## विद्यार्थ्यांची अशीही महादेव भक्ती



**दै. आवाज वृत्तसेवा...**
नांदगाव प्रतिनिधी : हिंदू धर्मातील पवित्र श्रावण महिना सुरू असून सर्वत्र भक्तीमय वातावरण आहे. प्रत्येक भाविक आपापल्या परीने भोळ्या शंकराची मनोभावे सेवा करीत आहे.नांदगाव शहरातील कमलाबाई माणिकचंद कासलीवाल विद्यालयाचे इयत्ता चौथीतील विद्यार्थी शिवाय सुदेश पेवाल याने महादेव श्री शंकराचे पेन्सिलने सुंदर असे चित्र काढून भक्तीभाव व्यक्त केला आहे.

शिवाय पेवाल यास चित्र काढण्याचा छंद असून तो पाच वर्षांचा असल्यापासून चित्र काढत आहे. त्याने आतापर्यंत अनेक महापुरुषांची, देवतांची चित्रे काढली आहेत. त्याची चित्रकलेतील आवड पाहून शहरातील चंडप्लाझा येतील राहणारे कला शिक्षक दिलीप मोरे विनाशुल्क त्याला मार्गदर्शन करीत आहेत .

## गोरखनाथ सावंत यांचे निधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**



शिंदेवाडी (ता कागल) येथील गोरखनाथ तुकाराम सावंत (वय ५८) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. उत्तरकार्य बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी शिंदेवाडी, ता.कागल येथे आहे

## एसआयपी ॲकॅडमीचा २२ वर्षे पूर्तीचा आनंदोत्सव

### १२५० हून अधिक केंद्रे आणि मुलांसाठी रॉकेट लाँच ड्रीमची योजना

**दै. आवाज वृत्तसेवा...**
नाशिक, ११ ऑगस्ट २०२५ : बालकांच्या कौशल्य विकास क्षेत्रातील भारतातील दिग्गज कंपनी एसआयपी ॲकॅडमीने कामकाजाची २२ वर्षे पूर्ण करून आणि देशभरात १२५० हून अधिक फ्रँचायझी केंद्रांचा विस्तार करून नुकताच एक मोठा टप्पा पार केला. त्यामुळे ती भारतातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण नेटवर्कपैकी एक बनली आहे.

एसआयपी ॲबॅकस, ग्लोबलआर्ट, मायकिड्स आणि क्रिको इंग्लिश यांसारखे प्रमुख कार्यक्रम राबविणाऱ्या या ॲकॅडमीने जीआरटी हॉटेल्सच्या ग्रँड चेन्नई येथे भव्य प्रमाणात हा वर्धापनदिन साजरा केला. या कार्यक्रमात शीर्ष फ्रँचायझी, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि भागीदार सहभागी झाले होते. भारतातील १४ लाखांहून अधिक मुलांवर प्रभाव पाडणाऱ्या प्रवासाचा हे सर्व जण भाग आहेत.

या उत्सवात एसआयपी ॲकॅडमीने शिक्षण, उत्साह आणि पर्यावरणीय कृती यांचा मिलाफ साधणारे तीन मोठे उपक्रम यावेळी जाहीर केले.

यामध्ये इस्रोच्या रॉकेट प्रक्षेपणाचा भव्य पुरस्कार असलेली राष्ट्रीय स्तरावरील गणित स्पर्धा हा प्रमुख उपक्रम आहे. एसआयपीची प्रमुख अंकगणितीय जीनियस स्पर्धा (ॲरिथमेटिक जीनियस कॉन्टेस्ट -एजीसी) ची १० वी आवृत्ती ही केवळ एक स्पर्धा नाही. ती भारताच्या भविष्याचे एक अग्रस्थान आहे. या वर्षी राष्ट्रीय विजेत्यांना श्रीहरिकोटा येथे इस्रोच्या रॉकेट प्रक्षेपणाचे थेट प्रक्षेपण पाहण्याचा अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे. त्यामुळे ते विज्ञान आणि अंतराळातील भारताच्या धाडसी कामगिरीचे प्रत्यक्ष साक्षीदार ठरतील.

भारताच्या अंतराळ आघाडीचा हा थेट अनुभव मुलांना देऊन एसआयपी ॲकॅडमी शैक्षणिक उत्कृष्टतेला पुरस्कृत करण्यापेक्षा आणखी बरेच काही करत आहे. ती कल्पनाशक्तीला चालना देत आहे, स्टेमच्या (एसटीईएम) स्वप्नांना चालना देत आहे आणि तरुण भारतीयांना देशाच्या वैज्ञानिक आकांक्षांच्या केंद्रस्थानी ठेवत आहे.

विद्यार्थ्यांना इको-चॅम्पियन बनवण्यासाठी तीन नवीन मियावाकी जंगले ही दुसरी योजना आहे. हवामान बदलाभोवती चर्चा जोर पकडत असताना एसआयपी ॲकॅडमी निसर्गाला शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणून कृती करत आहे. आपल्या २२ व्या वर्षाचे औचित्य साधून, ब्रँडच्या वतीने कोलकाता, तंजावर आणि शिवकाशी येथे तीन नवीन मियावाकी जंगले लावण्यात येणार आहे. वेगाने वाढणाऱ्या जपानी तंत्राचा वापर करून तयार केलेली ही दाट, स्थानिक हिरवीगार क्षेत्रे असतील.

ही शहरी जंगले जिवंत वर्गखोल्यांचे काम करतील, तिथे मुले केवळ पर्यावरणाबद्दल शिकणार नाहीत तर ते पुनर्बांधणीत सक्रियपणे योगदान देतील. शिक्षण हा केवळ परीक्षांचा नाही तर जबाबदारी, शाश्वतता आणि भविष्यासाठी तयार नागरिक घडवण्याचा विषय आहे, हा मोठा संदेश देणारे हे एक छोटे पाऊल आहे.

# विंचूरला भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात साजरा





**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर (प्रतिनिधी) - वस्त्र निर्माण करुन संपूर्ण विश्वाला वस्त्रे पुरविणारे भगवान श्री जिव्हेश्वर महाराज जन्मोत्सव सोहळा येथील स्वकुळ साळी समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भगवान श्री जिव्हेश्वर महाराज हे समस्त स्वकुळ साळी समाजाचे आद्य पुरुष आहेत. शिव शंकराच्या जिव्हेतून जिव्हेश्वरांचा जन्म झाला म्हणून त्यांना जिव्हेश्वर हे नाव मिळाले. विश्वातील मानव जातीला अंग झाकण्या करिता भगवान शंकर व माता पार्वतीच्या आज्ञेने भगवान श्री जिव्हेश्वरांनी हातमागाद्वारे वस्त्र निर्मिती करुन संपूर्ण सृष्टीला वस्त्र पुरवण्यासाठी वस्त्रोद्योग सुरू केला. समस्त स्वकुळ साळी समाजाच्या वस्त्रोद्योगाचे निर्माते भगवान श्री जिव्हेश्वर हे आहेत. भगवान श्री जिव्हेश्वर महाराज जन्मोत्सवा निमित्ताने येथील भवानी पेठेतील भगवान श्री जिव्हेश्वर महाराज मंदिरात भजनी मंडळांच्या उपस्थित पहाटे काकड आरती, पाळणा आरती व महाभिषेक आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.तर सायंकाळी सजविलेल्या रथातून भगवान श्री जिव्हेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. शोभायात्रा संपन्न झाल्यानंतर महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी स्वकुळ साळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देसराणे येथे बिबट्याच्या हल्ल्यात शेळ्या ठार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

महेश कुवर, कळवण तालुक्यातील पुनद खोऱ्यात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याची दहशत पसरली आहे. पुनद खोऱ्यात बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होतांना दिसत आहे. देसराणे येथील शेतकरी गोकुळ पंडित पवार यांच्या शेतातील शेड मध्ये रात्रीच्या सुमारास बिबट्याने अचानक शेळ्यांवर हल्ला केल्याने अनेक शेळ्या ठार झाल्या व काही शेळ्या गंभीर जखमी आढळून आल्या.मात्र वेळेवर अजूबाजूंच्या शेतकऱ्यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने तिथून पळ काढला. तसेच काही दिवसांपूर्वी मोकभणगी परीसरात देखील बिबट्याने अनेक शेळ्या फस्त केल्याची घटना घडली होती त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभाग अधिकारी भोये मॅडम यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली असता त्यामुळे गतप्राण झालेल्या शेळी मालकास नुकसान भरपाई मिळावी व वनविभागाने परिसरात गस्त वाढवावी तसेच परिसरात ठिकठिकाणी पिंजरा बसविण्यात यावा अशी मागणी परिसरातील शेतकरी बांधवांनी केली आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील निधी वाढवून बांधकाम साहित्याची उपलब्धता करावी सरपंच सेवा महासंघाची शासनाकडे मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - ग्रामीण भागातील गरीब व गरजूंना पक्के घर मिळावे, या उद्देशाने प्रधानमंत्री आवास योजना राबविली जाते. मात्र, वाढत्या बांधकाम खर्चामुळे लाभार्थ्यांना घर पूर्ण करणे कठीण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर सरपंच सेवा महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे वाढीव निधी आणि बांधकाम साहित्य उपलब्धतेसंदर्भात पावले उचलण्याची मागणी केली आहे.

निवेदनावर संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे, जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब मस्के, तालुका अध्यक्ष मंगेश गवळी,तालुका उपाध्यक्ष शांताराम कांगणे,तालुका कार्याध्यक्ष रामभाऊ जगताप, तालुका उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भडांगे,तालुका प्रसिध्दी प्रमुख प्रविण नाईक,तालुका कोषाध्यक्ष सचिन दरेकर, तालुका सचिव शरद भडांगे,तालुका महिला अध्यक्ष ज्योतीताई सुराशे,तालुका महिला उपाध्यक्ष तेजल रायते, तालुका सरचिटणीस शांताराम जाधव, तालुका संघटक तुकाराम गांगुर्डे, तालुका संपर्क प्रमुख लहानु मेमाणे, तालुका सल्लागार डॉ. श्रीकांत आवारे,तालुका सह संपर्क प्रमुख विलास जाधव आदींच्या स्वाक्षऱ्या आहे.

# झगडपाडा - भिवतास धबधबा मार्गावरील पुलाच्या पुनर्बांधणीबाबत ग्रामस्थांची मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड.. झगडपाडा ते शिवमंदिर नदीपर्यंत रस्ता पूर्ण झाला असला, तरी पूल आणि पुढील रस्ता होण्यास काही कारणामुळे काम थांबले आहे. नदीपासून अवघ्या ५०० ते ६०० मीटर अंतरावर भिवतास धबधबा असून, तेथे जाण्यासाठी अद्याप रस्ता झालेला नाही. यामुळे ग्रामस्थांसह पर्यटकांनाही मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.भिवतास धबधबा हे आपल्या परिसरातील अत्यंत सुंदर व रमणीय पर्यटनस्थळ आहे. दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात. पूर्वी येथे जाण्यासाठी एक मजबूत आणि सुरक्षित कोल्हापूर बंधारा होता. मात्र, या बंधाऱ्याला सुमारे २० ते २५ वर्षे उलटल्यामुळे तो तुटून वाहून गेला आहे. परिणामी,



पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

यामुळे पर्यटकांची संख्या घटली असून, स्थानिकांच्या रोजगाराच्या संधींवरही नकारात्मक परिणाम झाला आहे. विशेषत: पावसाळ्यात किंवा नदीला पूर आल्यास या ठिकाणी जाणे-येणे पूर्णपणे बंद होते, ज्यामुळे ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते.त्यामुळे संबंधित विभाग व लोकप्रतिनिधी नीं तातडीने कार्यवाही करून भिवतास धबधबा पर्यटन स्थळावरील पूल बांधणी करावी अशी हिरामण महाले, नामदेव परशराम पाडवी, जयराम घांगळे, शंकर महाले, परशराम पाडवी, या ग्रामस्थांनी केली आहे.

**या पुलाचे पुनर्बांधकाम तातडीने होणे हे केवळ पर्यटकांच्या सोयीसाठीच नव्हे, तर गावाच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि सुरक्षित वाहतुकीसाठीही अत्यावश्यक आहे. हा पूल आपल्या गावाची ओळख, सोय आणि विकासाचा महत्त्वाचा दुवा आहे.तरी होणे अपेक्षित आहे.**

**हिरामण महाले, झगडापाडा**




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

* शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून

**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**

प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




*** वैशिष्टे ***

* उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
* भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
* सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
* ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
* मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
* भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
* मर्यादित विद्यार्थी संख्या

**प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९**

पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

* प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५-२६

**पदवी अभ्यासक्रम**

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. Eniglish<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Commerce)<br>Business Administration<br>Marketing |

**प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल**

१) अॅडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

* अधिक माहितीसाठी संपर्क *

* प्राचार्य :- मोबा. 9922172799




**वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्‌घाटन सोहळा जाहिरात तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

* संपर्क *

९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४